Khar Land Research Station,
Panvel – 410 206 Dist – Raigad.
(Maharastra State)

खार जमीन संशोधन केंद्र,
पनवेल ४१० २०६ जिल्हा–रायगड
(महाराष्ट्र राज्य),

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

दुरध्वनी नं. 022 27452775 फॅक्स नं. 022 27452775 E-mail -klrs59@rediffmail.com

जा.क्र.खाजशा/आरकेव्हीवाय/जेसीबी/ /२०२२ दिनांक ः-

प्रती,
.................................
.................................
.................................

**विषय ः- खार जमीन संशोधन केंद्र पनवेल येथील नाला खोल व रूंद करण्यासाठी भाडेतत्त्वावर जेसीबी मिळणे बाबत ...**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वे आपणांस कळविण्यात येते की, खार जमीन संशोधन केंद्र पनवेल येथेल प्रक्षेत्रावरील पाण्याचा निचरा होण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने नाला खोल व रूंद करावयाचा आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे देत आहोत.

| अ.क्र | तपशिल | करावयाच्या कामचे अंदाजे प्रमाण | प्रती तास दर रूपये | एकूण रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | भाडे तत्त्वावर जेसीबीच्या सहाय्याने नाला खोल व रूंद करणे | २० तास | | |
| २ | जीएसटी | | | |
| | एकूण रूपये | | | |

तरी वरील जेसीबीच्या सहाय्याने नाला खोल व रूंद या कँदावर येऊन करून दयाल अशा बेताचे जीएसटी नमुद करून दरपत्रक पोष्टाने /कुरियरने दिनांक २०.०९.२०२२ रोजी पर्यंत या कार्यालयात निम्नस्वाक्षरीकार यांचे नावे पोहच होतील असे पाठवावेत.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

१. दरपत्रक मेहरबंद लिफाफ्यात व लिफाफ्यावर भाडे तत्त्वावर जेसीबीचे दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.
२. जेसीबी या कार्यालयातील प्रक्षेत्रावर पोहच व कार्यान्वीत (जोडणी) करावयाची आहे. दरपत्रक दि. २०.९.२०२२ पर्यंत या कार्यालयास पोहचणे आवश्यक आहे. दिलेल्या काळावधीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
३. दरपत्रक मा. खार जमीन शास्त्रज्ञ, खार जमीन संशोधन केंद्र, बंदर रोड, जुना कार्टासमोर पनवेल, जि. रायगड यांचे नावे पाठवावे.
४. प्राप्त दरपत्रके दिनांक २१.०९.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता पनवेल येथील मुख्य कार्यालयात उघडण्यात येतील.
५. दरपत्रकामध्ये जीएसटी क्रमांक नमूद करावा जीएसटी क्रमांक नसल्यास लेटर हेडवर दरपत्रक देण्यात यावे व पॅनकार्डची छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक राहील.
६. कामाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहूनच दरपत्रकामध्ये दर प्रती तास असे स्पष्ट सदर करावेत. कोण्त्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. पुर्ण केलेल्या कामाचे प्रती तासा प्रमाणे देयक देण्यात येईल.
७. जेसीबी अथवा चालकास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. कोणत्याही अपघात झाल्यास त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.
८. जेसीबीसाठी आवश्यक असलेले इंधन/वंगण व जेसीबीची दुरूस्ती देखभाल याची जबाबदारी जेसीबी पुरवठादार यांची असेल.
९. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा, मागे घेण्याचा, दुरूस्ती करण्याचा किंवा नियंत तारिख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

आपला विश्वासु

खार जमीन शास्त्रज्ञ
खार जमीन संशोधन केंद्र
पनवेल, जि. रायगड